BSE
EXPERIENCE THE NEW

# सोन्यात गुंतवणूक करण्याची नवीन युगातील अडचणमुक्त पद्धत.



बीएसई हा १८७५ मध्ये स्थापन झालेला आशियातील पहिला शेअर बाजार आहे.

बीएसईचा वेग ६ मायक्रोसेकंद असून तो जगातील सर्वांत वेगवान शेअर बाजार आहे.

भारतातील पहिला वैश्विक एक्स्चेंज जो तुम्हाला समभाग, चलन, कमॉडिटी, स्थिर उत्पन्न, म्युच्युअल फंड्स आणि ईजीआरमध्ये कार्यक्षम आणि पारदर्शक पद्धतीने गुंतवणूक करण्यासाठी बाजारपेठ देतो.

बीएसईकडे १३००+ ब्रोकर्स, २.५ लाख अधिकृत व्यक्ती, १०० दशलक्ष+ गुंतवणूकदार खाती, ७५०००+ म्युच्युअल फंड वितरक आहेत.

बीएसई हा इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट (ईजीआर) सुरू करणारा भारतातील पहिला एक्स्चेंज आहे.

# ईजीआरची कथा

## फेब्रुवारी २०२१

२०२१-२२ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी गोल्ड स्पॉट एक्स्चेंजच्या स्थापनेची आणि सेबी हा प्रस्तावित गोल्ड एक्स्चेंजेससाठी निर्देशित नियामक असल्याची घोषणा केली.

## मे २०२१

सेबीने एक्स्चेंजसाठी मसुदा विनियम प्रस्तावित करणारा एक प्रबंध जारी केला ज्याद्वारे इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट (ईजीआर)च्या स्वरूपात सोन्यामध्ये व्यापार करण्याची अनुमती देण्यात येईल.

## सप्टेंबर २०२१

सेबी संचालक मंडळाने इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीटमध्ये व्यवहार करण्यासाठी आराखडा निश्चित केला.

## सप्टेंबर २०२१

सेबीने भारतात गोल्ड एक्स्चेंजसाठी आणि सेबी (व्हॉल्ट मॅनेजर्स) विनियम २०२१ साठी आराखडा प्रस्तावित केला.

## डिसेंबर २०२१

वित्त मंत्रालयाने सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट्स (विनियम) कायदा १९५६ अंतर्गत 'इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट्स' (ईजीआर)ना 'सिक्युरीटीज' मध्ये समाविष्ट केले.

# सोने आणि भारत

सोने सर्व मौल्यवान धातूंपैकी सर्वाधिक आवडीचा धातू असून तो जगभरात त्याचे सौंदर्य, रोखता, गुंतवणुकीच्या क्षमता आणि औद्योगिक घटकांसाठी खरेदी केला जातो. एक गुंतवणुकीचे माध्यम म्हणून सोने सामान्यत: वित्तीय मालमत्ता म्हणून मानले जाते, जे चलनवाढीच्या कालावधीत त्याचे मूल्य आणि खरेदीची क्षमता राखून ठेवते.

सोन्याला भारतातील फक्त सांस्कृतिक बाबीतच महत्त्वाचे स्थान नाही तर अर्थव्यवस्थेतही आहे. भारतातील लग्ने सोन्याच्या दागिन्यांशिवाय पूर्ण होत नाहीत असे म्हटले जाते. सोन्याशी असलेले हे नाते फक्त परंपरेच्या दृष्टीनेच नाही तर आर्थिक दृष्टीकोनातूनही पाहिले जाते.

भारतातील सोन्याची मागणी प्रामुख्याने आयातीद्वारे पूर्ण केली जाते. सोन्याच्या आयातीसाठी भारत हा आघाडीच्या देशांपैकी एक आहे. आर्थिक वर्ष २०२१ मध्ये भारताच्या सोने आयातीचे मूल्य ३.७० ट्रिलियन भारतीय रूपये होते.

### जानेवारी २०२२

सेबीने भारतात गोल्ड एक्स्चेंज चालवण्याच्या आराखड्याबाबत एक परिपत्रक जारी केले.

### फेब्रुवारी/मार्च/एप्रिल २०२२

सेबीने व्हॉल्ट मॅनेजर्स आणि डिपॉझिटरीज, उत्पादनाचे तपशील, धोका व्यवस्थापन यांच्यासाठी व्यापार वैशिष्टे आणि एसओपींवर एक परिपत्रक जारी केले.

### सप्टेंबर २०२२

बीएसईला सेबीकडून अंतिम मान्यता प्राप्त.

### ऑक्टोबर २०२२

२४ ऑक्टोबर २०२२ रोजी बीएसई ईजीआरची स्थापना.

# दिमाखदार क्षणाची क्षणचित्रे

भारतातील सर्वांत महत्त्वाच्या एक्स्चेंज असलेल्या बीएसईने सेबीचे कार्यकारी संचालक सन्माननीय श्री. व्ही. एस. सुंदरेसन यांच्या उपस्थितीत दिवाळीच्या पवित्र दिनी इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट (ईजीआर)ची यशस्वी लाँच केली.




# देशभरातील संक्षिप्तात माहिती



## BSE launches electronic gold receipts

## बीएसई ने लॉन्च की इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट... शेयरों की तरह होगी सोने की ट्रेडिंग

## મુંબઈ શેરબજારે ઇલેક્ટ્રોનિક ગોલ્ડ રિસિપ્ટ્સ લૉન્ચ કરી

## मुहूर्ताच्या सौद्यांत सोन्याचे युनिट्स

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

दिवाळीच्या लक्ष्मीपूजनानिमित्त मुंबई व राष्ट्रीय शेअर बाजारात मुहूर्ताचे सौदे सोमवारी झाले. या सौद्यांदरम्यान मुंबई शेअर बाजाराने (बीएसई) इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसिट्स (ईजीआर) ही सोन्यातील गुंतवणुकीची सुविधा सुरू केली. अशी सुविधा सुरू करणारा मुंबई शेअर बाजार हा देशातील पहिला भांडवल बाजार ठरला आहे.

ईजीआरअंतर्गत ९९५ व ९९९ शुद्धता असलेल्या सोन्याच्या ईजीआर सोमवारी मुंबई शेअर बाजारात दाखल करण्यात आल्या. या ईजीआरमधील ट्रेडिंग एक ग्रॅम व त्याच्या गुणाकारात खरेदी करता येईल.

**ईजीआर म्हणजे काय?**

शेअर बाजारांत प्रत्यक्ष सोन्याची थेट खरेदी व विक्री करता येऊ शकणाऱ्या साधनांना इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसिट्स किंवा ईजीआर म्हणतात. या रिसिट्स शेअर्सप्रमाणेच असतात. त्यामुळे त्यांची खरेदी-विक्री थेट शेअर बाजाराच्या मंचावर होऊ शकते. खरेदी केलेल्या ईजीआर गुंतवणूकदाराच्या डीमॅट खात्यात राहतात. प्रत्यक्ष सोने खरेदी करून जोखीम उचलण्यापेक्षा अशा प्रकारे शेअर बाजारातून सोने खरेदी करणे हे कमी जोखमीचे ठरते.

> भांडवल बाजार नियंत्रक सेबीने आम्हाला ईजीआर आणण्याची अनुमती दिली. त्याचप्रमाणे सर्व डिपॉझिटरी, व्हॉल्ट मॅनेजर्स, आयातदार, बँका, रिफायनर्स, बुलियन ट्रेडर्स, दागिने उत्पादक या सर्वांचे आभार. ईजीआर शेअर बाजारात येणे ही घटना देशाप्रमाणे विदेशी बुलियन उद्योगासाठी खूप मोठी आहे.
>
> – समीर पाटील, सीबीओ, बीएसई

## BSE launches Electronic Gold Receipts

NEW DELHI, OCT 25 /--/ Leading stock exchange BSE has launched Electronic Gold Receipt (EGR) on its platform, a move that will help in efficient and transparent price discovery of the yellow metal. It introduced two new products of 995 and 999 purity during the Muhurat trading on Diwali and trading will be in multiples of 1 gram and deliveries in multiples of 10 gram and 100 gram, the exchange said in a statement.

The announcement came after the exchange last month received final approval from the Securities and Exchange Board of India (Sebi) for introducing EGR on its platform.

BSE in February received in-principle approval from Sebi after which the exchange conducted several mock trading in the test environment for its members to facilitate trading in EGRs.

EGRs will cater to all market participants, which means that buyers and sellers on the exchange will include individual investors, as well as commercial participants along the value chain like importers, banks, refiners, bullion traders, jewellery manufacturers, and retailers.

"The launch of EGRs represents a significant milestone not only for the BSE but also for the global bullion industry. BSE is committed to continuously facilitating access to high-quality investment-based products and services for our stakeholders," Sameer Patil, CBO at BSE said on Monday.

The EGR platform will lead to greater assurance in the quality of gold supplied, efficient price discovery, and transparency in transacting. This can create a vibrant gold ecosystem in India by enabling actual fungibility of gold. India is the second largest consumer of gold globally with annual gold demand of approximately 800-900 tonne and holds an important position in the global markets.

The country has remained a price-taker in the global markets, and at present, does not play any significant role in influencing the price-setting for the commodity. A platform for EGR infuses transparency in gold spot transactions, enables India to emerge as the price setter, and would eliminate existing market inefficiencies. (PTI)

## BSE पर भी सोने की खरीद-बिक्री

बीएसई ने इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसिप्ट की शुरूआत कर दी है. जिससे अब आसानी से बीएसई पर सोने की खरीद-बिक्री कर सकेंगे. क्योंकि इसके लिए पूंजी बाजार नियामक सेबी से बीएसई को अपने प्लेटफॉर्म पर इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीप्ट की शुरूआत करने की अनुमति मिल चुकी है. एक्सचेंज दिवाली पर मुहूर्त कारोबार के दौरान 995 और 999 शुद्धता के दो नए उत्पाद पेश किए हैं. इसके तहत कारोबार एक ग्राम के गुणकों में और आपूर्ति 10 ग्राम तथा 100 ग्राम के गुणकों में होगी. पिछले महीने एक्सचेंज को 'सेबी' ने ईजीआर पेश करने की अंतिम मंजूरी दी थी. ईजीआर के जरिये सोने में ट्रेडिंग दिवाली से शुरू हो गई है. इसके लिए आपके पास डीमैट अकाउंट होना जरूरी है, इसके लिए अलग से कोई खाता खुलवाने की जरूरत नहीं पड़ेगी.

# इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट्स (ईजीआर) समजून घेताना



इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सोने सादर करणाऱ्या साधनांना इलेक्ट्रॉनिक गोल्ड रिसीट्स (ईजीआर) असे म्हटले गेले आहे आणि सिक्युरिटीज म्हणून संबोधित केले गेले आहे. याची व्यापार, क्लिअरिंग आणि समायोजन वैशिष्टे भारतात सध्या उपलब्ध असलेल्या सिक्युरिटीजसारखीच आहेत.

- बुलियन ट्रेडिंगसाठी इलेक्ट्रॉनिक, प्रभावी आणि पारदर्शक व्यासपीठ.
- कार्यक्षम किंतम शोध आणि सोन्याचे मानकीकरण
- सोन्याच्या दर्जाची हमी
- गुंतवणूकदारांना समायोजनाची हमी
- सोन्याच्या डिलिव्हरीची फंजिबलिटी

# बीएसई ईजीआरची प्रमुख वैशिष्टे

| | |
|---|---|
| ईजीआर अनावरण | बीएसईवर नवीन विभाग |
| पर्यावरण | सेबी, एक्स्चेंजेस, क्लिअरिंग कॉर्पोरेशन्स, डिपॉझिटरीज, व्हॉल्ट मॅनेजर्स |
| मालमत्ता वर्ग | एससीआरए १९५६ अंतर्गत सिक्युरिटीज |
| डिपॉझिटरी | सीडीएसएल, एनएसडीएल |
| मार्जिन | व्हीएआर + ईएलएम+ एमटीएम |
| समायोजन | टी+१ |
| दिलेली किंमत | रू. प्रतिग्राम |
| बाजाराच्या वेळा | सकाळी ९.00 ते रात्री ९.00 |
| सोने ठेवण्याचे आणि काढून घेण्याचे वेळापत्रक | सकाळी १0.00 ते दुपारी ३.00 |
| व्हॉल्ट मॅनेजर्स | सोने साठवणे आणि सुरक्षित ठेवण, सोने ठेवण्याची आणि काढून घेण्याची सुविधा, ईजीआरची निर्मिती आणि बंद करणे. |
| तारण | ईजीआर हे २0 टक्के कपातीसह तारण म्हणून स्वीकारले जाते. |
| टी+ रोलिंग समायोजन | दुपारी २.00– निधी आणि ईजीआर स्वीकार<br>दुपारी ४.३0– निधी आणि ईजीआर प्रदान |
| व्हॉल्टची फंजिबिलिटी | कोणताही व्हॉल्ट निवडण्याचा पर्याय |

# उत्पादनाचे तपशील

| स्क्रिप्ट कोड | MG100G1B95 | MG100G1B99 | G1G10B95 | G1G10B99 | G10G100B95 | G10G100B99 |
|---|---|---|---|---|---|---|
| ट्रेडिंग युनिट | १00 मिलिग्रॅम | १00 मिलिग्रॅम | मिलिग्रॅम | ग्रॅम | १0 ग्रॅम | १0 ग्रॅम |
| डिपॉझिट युनिट/ विड्रॉवल युनिट | १ ग्रॅम | १ ग्रॅम | १0 ग्रॅम | १0 ग्रॅम | १00 ग्रॅम | १00 ग्रॅम |
| शुद्धता | ९९५ | ९९९ | ९९५ | ९९९ | ९९५ | ९९९ |
| दिलेली किंमत | प्रति १00 मिलिग्रॅम रूपये | प्रति १00 मिलिग्रॅम रूपये | प्रति ग्रॅम रूपये | प्रति ग्रॅम रूपये | प्रति १0 मिलिग्रॅम रूपये | प्रति १0 मिलिग्रॅम रूपये |
| टिक साइज | 0.१0 रूपये | 0.१0 रूपये | १ रूपये | १ रूपये | १ रूपये | १ रूपये |

# ईजीआरवर ऑनबोर्डिंग

## प्रत्यक्ष सोन्यापासून ईजीआरवर रूपांतरण




### गोल्ड डिपॉझिटर
सोने व्हॉल्टमध्ये
जमा करतात

### डिपॉझिटरीज
ईजीआर ठेवीदाराच्या डिमॅट
खात्यात जमा केले जातात आणि
एक्स्चेंजवर व्यापारासाठी उपलब्ध असतात

### व्हॉल्ट मॅनेजर
सोने प्राप्त झाल्यानंतर
व्हॉल्ट मॅनेजर सर्व पडताळणी
करून ईजीआर तयार करेल

## एक्स्चेंजवर ईजीआरचा व्यवहार




बीएसईवरील सर्व व्यवहार राष्ट्रीय पातळीवरील इलेक्ट्रॉनिक ट्रेडिंग प्लॅटफॉर्मद्वारे होतात. तो बीएसईच्या सदस्यांकडे स्थित असलेल्या टर्मिनल्सवरून पाहता येतो.

सहभागी बीएसईच्या व्यापारी सदस्यांमार्फत व्यापार करू शकतात. सहभागींना ट्रेडिंग सदस्य/ डीपीकडे एक ट्रेडिंग खाते आणि डिमॅट खाते उघडावे लागेल.

गुंतवणूकदार ईजीआरमध्ये गुंतवणूक/ व्यापार करण्यासाठी आपले अस्तित्वातील ट्रेडिंग आणि डिमॅट खाते वापरू शकतात.

## ईजीआरकडून प्रत्यक्ष सोन्यात रूपांतरण



### डिपॉझिटरीज
ईजीआरच्या बदल्यात प्रत्यक्ष सोने
घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थी मालकाकडून
डिपॉझिटरीकडे विनंती दाखल केली जाईल.

### व्हॉल्ट मॅनेजर
व्हॉल्ट मॅनेजर
ईजीआरचे रूपांतर
प्रत्यक्ष सोन्यात करतो.

### रिटेल ग्राहक/जवाहिरे
लाभार्थी मालक
व्हॉल्टच्या ठिकाणाहून
सोने ताब्यात घेतात.

## ईजीआर अभिप्राय

SENSEX | EGR

| Scrip ID | U/D | BQty | BRate | ORate | OQty | LTP | % Chg | Close | Volume | Turnover | Open | TBQ | TSQ | High | Low | WAP | Trades | 52Wk Higl | 52Wk L |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| E995100GT1 | ▼ | 2 | 47800.00 | 47900.00 | 1 | 47800.00 | -4.86 % | 0240.00 | 15 | 7.40 L | 50240.00 | 2 | 1 | 51000.00 | 47800.00 | 49354.66 | 10 | | |
| E999100GT1 | ▲ | 3 | 50060.00 | 50080.00 | 2 | 50072.00 | +0.02 % | 0060.00 | 1 | 50072.00 | 50072.00 | 3 | 2 | 50072.00 | 50072.00 | 50072.00 | 1 | | |
| E99510GT1 | ▲ | 2 | 5035.00 | 5040.00 | 2 | 5035.00 | +0.00 % | 5035.00 | 1 | 5035.00 | 5035.00 | 3 | 2 | 5035.00 | 5035.00 | 5035.00 | 1 | | |
| E99910GT1 | ▼ | | | 5402.00 | 1 | 5401.00 | -4.79 % | 5673.00 | 4 | 21703.00 | 5500.00 | | 1 | 5500.00 | 5401.00 | 5425.75 | 3 | | |

Quotes will be available on the BSE website: www.bseindia.com
Live quotes shall be available at exchange trading terminals.

BSE
EXPERIENCE THE NEW

बीएसई लिमिटेड, पी. जे. टॉवर्स, दलाल स्ट्रीट, मुंबई– ४००००१, भारत.
www.bseindia.com

BSE EGR ELECTRONIC GOLD RECEIPTS

अधिक माहितीसाठी भेट द्या
https://www.bseindia.com/static/markets/EGR/about_egr.aspx